No. MAT/MUM/ ... 1528/17

12 APR 2017

मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर
मुळ अर्ज क्रंमाक ३२१ / २०१५.

श्री. धिरज लक्ष्मण भालेराव व २२० इतर ....... अर्जदार

विरुध्द

पोलीस महासंचालक (म.रा.), मुंबई व ०९ इतर ....... प्रतिवादी

वरील सर्व अर्जदारांना मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर वरील नमूद मुळ अर्ज दाखल करुन मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पारीत केलेला आदेश दिनांक ०३/१२/२०१४ च्या आदेशास आव्हान दिलेले आहे. या आदेशानुसार वरील मुळ अर्जामधील पोलीस उपनिरिक्षक या पदांवर सत्र क्रं.१०९ (खात्याअंतर्गत सरळसेवा) मधील प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरिक्षक म्हणून नेमणूक झालेल्या काही अर्जदारांना पोलीस महासंचालकांनी असे कळविले आहे की, त्यांनी पोलीस उपनिरिक्षक या संवर्गात १०८ बॅचेसच्या पोलीस उपनिरिक्षक (सरळ सेवा माध्यम), यांचेवर मागणी केलेली सेवा ज्येष्ठता देता येणार नाही. सदर मुळ अर्जात एकूण सात ज्या पोलीस उपनिरिक्षकांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण यांचे समोर वरील नमूद अर्ज दाखल करुन वरील ज्येष्ठता यादीत वरील जागा मिळवली आहे, त्यांना पक्षकार केले आहे. इतर ज्या पोलीस उपनिरिक्षकांना मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई यांचे समोर येवून दिनांक ३/१२/२०१४ रोजीच्या आदेशाच्या संदर्भात त्यांनी पुढील तारखेस म्हणजे दिनांक १५/०६/२०१७ रोजी सुनावणीस प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत उपस्थित राहून आपली बाजू मांडण्याची संधी या जाहीर नोटीसद्वारे देण्यांत येत आहे.

सदर जाहीर नोटीस मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण मुंबई यांच्या दिनांक २७/३/१७ रोजीच्या आदेशानुसार प्रकाशित करण्यात येत आहे

Sd/-

अर्जदाराचे वकील
ॲड. गौरव अरविंद बांदिवडेकर
म.प्र.न्या., मुंबई.

ठिकाण -मुंबई
दिनांक-१२/०४/२०१७.

मा.प्रबंधक, म.प्र.न्या. मुंबई यांच्या आदेशान्वये

Sd/-

सु.क.जोशी.
प्रबंधक
महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण
मुंबई.

